**विषय :- सर्व खाते प्रमुख, अधिकारी यांनी त्यांचे अधिनिस्त संवर्गातील कर्मचाऱ्यांचे पदोन्नती प्रकरणी नस्ती सादर करताना घ्यावयाचे दक्षते बाबत.**

परिपत्रक

सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद वाशिम

परिपत्रक क्रमांक जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-१/ १८११/२०१८

दिनांक१७ एप्रील २०१८

माझे असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषदेमध्ये विविध विभागामधील कार्यरत कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याकरीता नस्ती मंजुरी करीता सादर करण्यात येत असुन सदर नस्तीची पडताळणी ही सबंधीत विभागाकडुन बरोबर होत नसल्याने या बाबत बऱ्याच अडचणी उद्‌भवण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच चुकीच्या पदोन्नती प्रकरणी कर्मचारी हे न्यायालयात जात असल्याचे दिसुन येत आहे.

करीता पदोन्नतीची नस्ती बिंदुनावलीचे अनुषंगाने मंजुरीस सादर करतांना विभाग प्रमुख, खाते प्रमुख, कार्यालय प्रमुख यांनी सबंधीत पदोन्नती नस्तीची पुर्व पडताळणी करणे करीता खालील प्रमाणे पदोन्नती प्राथमिक तपासणी चौकशी समिती करुन पडताळणी करुन घेवुन त्यानंतर पदोन्नती करीता प्रस्ताव पदोन्नती समिती समोर सादर करावे.

१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद वाशिम
३. जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद वाशिम
४. सबंधीत खाते प्रमुख
५. सबंधीत कार्यालयाचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी/ सहाय्यक प्रशासन अधिकारी

वरील प्रमाणे पदोन्नती प्राथमिक तपासणी चौकशी समिती गठित करण्यात येत असुन सर्व विभागांनी शासन निण्रय, परीपत्रके, बिंदु नामावली चे अनुषंगाने पदोन्नतीच्या सर्व नस्ती प्राथमिक तपासणी चौकशी समितीकडुन पडताळणी करुनच पदोन्नती करीता प्रस्ताव पदोन्नती समिती समोर सादर करावे.

यापुढे सदर परिपत्रकातील निर्देशानुसार करण्याबाबत सर्व विभागांनी नोंद घ्यावी.

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद ,वाशिम**

प्रति,

१. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी ,जि.प.वाशिम यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) जिल्हा परिषद वाशिम यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.
४. खाते प्रमुख - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - जि.प.वाशिम यांना माहीती व कार्यवाहीस्तव

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद ,वाशिम**